





सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar








बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २९२ वा ■ शुक्रवार १ ऑगस्ट २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २ ऑगस्ट २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 292 ■ Friday 1 August 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# जिल्ह्यात खळबळ! पिकविमा योजनेत ढेकणमोहा तांडा गायब



## जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे शेतकऱ्यांचे लक्ष

बीड (सरकार): जिल्ह्यातील बोगस पिक विमा राज्यासह दिल्लीच्या तख्तापर्यंत गाजला आहे. कृषी विभागाने शेतकऱ्याची कशी वाट लावली हे न सांगितलेले बरे. मात्र आता कृषी विभागाच्या आशीर्वादाने जिल्ह्यात खळबळ उडवून देणारे कृत्य घडले आहे. बीड तालुक्यातील ढेकणमोहा तांडा पिक विमा योजनेतून गायब झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी या गंभीर बाबीवर लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय देणार का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत प्रधानमंत्री पिक विमा योजनेत शेतकऱ्यांना अर्ज भरताना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले असून, याबाबत तात्काळ कारवाई करण्याचे आदेश तालुका कृषी अधिकारी, बीड यांनी दिले आहेत.

दिनांक २५ जुलै २०२५ रोजी मंडळ कृषी अधिकारी के. के. अंबेकर यांनी पाठवलेल्या अहवालात संबंधित अडचणी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे पिक विमा अर्ज वेळेत भरले जावेत यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याचे निर्देश तालुका कृषी




अधिकारी यांनी दिले आहेत. शेतकऱ्यांना अर्ज भरण्यात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी संबंधित विभागाने कार्यालयीन पातळीवर मदत केंद्रे स्थापन करून त्वरित कार्यवाही करावी, असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.सदर माहिती उपविभागीय कृषी अधिकारी, बीड यांनाही सादर करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील बोगस पिक विम्याचे प्रकरण गाजत असताना कोट्यावधी रूपयांचा भ्रष्टाचार यामध्ये झाल्याचे समोर आले आहे. हे प्रकरण राज्यात गाजत असताना बीड तालुक्यातील ढेकणमोहा या गावाच्या काही अंतरावर असलेला तांडा पिक विमा योजनेतून गायब झाला आहे. त्यामुळे ही बाब गंभीर असून येथील शेतकऱ्यांना पालकमंत्री, जिल्हाधिकारी न्याय देतील का? आणि हा झालेला प्रकार कोणाच्या हलगर्जीने झाला त्यावर गंभीर स्वरूपाची कारवाई करणार आहेत का? असा सवाल शेतकरी वर्गातून होत आहे.

# परळीमध्ये शिवशाहीला अपघातात ;एक ठार

## संतप्त जमावाने शिवशाही फोडली





बीड (सरकार): बीडहून नांदेड कडे निघालेल्या शिवशाही एसटी बसचा आणि रिक्षाचा अपघात होऊन एक जण ठार झाल्याची घटना परळी नजीक पांगरी कॅम्प येथे घडली.

सकाळी आठ साडेआठ वाजण्याच्या सुमारास बीडहून परळी मार्गे नांदेड कडे निघालेल्या शिवशाही बसची आणि रिक्षाची समोरासमोर धडक झाली यामध्ये रिक्षा चालकाचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शेतात कामासाठी महिलांना सोडून हा रिक्षा परळी कडे निघाला होता त्यावेळी पांगरी कॅम्प नजीक हा अपघात घडला अपघातानंतर तासभर बीड परळी महामार्गावरील वाहतूक खोळंबली होती घटनेची माहिती प्राप्त होतात परळी ग्रामीणचे पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

# उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच जगदीप धनखड यांनी प्रकृतीचं कारण देत उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झालं आहे. दरम्यान, नव्या उपराष्ट्रपतींची निवड करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.त्यानुसार आता ९ सप्टेंबर रोजी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ७ ऑगस्ट रोजी या निवडणुकीसाठी अधिसूचना जाहीर होणार आहे. तर २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठीची शेवटची तारीख २५ ऑगस्ट असेल. ९ सप्टेंबर रोजी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदान होणार असून, सकाळी १० ते संध्याकाळी ५ ही मतदानाची वेळ असेल. तसेच मतदान आटोपल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी होणार आहे.

# वाळू वाहतूक करणारा टिप्पर टेम्पोवर धडकला;सुदैवाने जीवितहानी टळली



बीड (सरकार) टायर फुटल्याने अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या भरधाव टिप्पर विरुद्ध दिशेने जाऊन एका टेम्पोवर जाऊन धडकल्याची घटना आज, शुक्रवारी सकाळी साडेसहाच्या दरम्यान बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील सांगवी शिवारात घडली. सुदैवाने या अपघात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

अहिल्यानगर येथून पीव्हीसी पाईप घेऊन एक टेम्पो ( क्रमांक एम.एच १६,ए.वाय.३२२३) सकाळी बीडकडे रवाना झाला. तर याचवेळी डोईठाण वरून धामणगावकडे अवैध वाळू वाहतूक करणारे टिप्पर भरधाव वेगात जात होता. सकाळी साडेसहाच्या दरम्यान बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील आष्टी तालुक्यातील सांगवी परिसरात टायर फुटल्याने टेम्पो अनियंत्रित होऊन विरुद्ध दिशेला जाऊन टेम्पोवर धडकला. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने चालक किरकोळ जखमी झाले आहेत. माहिती मिळताच घटनास्थळी कडा पोलिस चौकीचे पोलिस हवालदार भाऊसाहेब आहेर, अमोल नवले, वाहन चालक प्रताप घोडके यांनी भेट दिली असून पंचनामा केला आहे. सकाळी साडेसहाच्या दरम्यान बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावर दोन्ही वाहनांचा अपघात झाला. अपघात होऊन सहा तास उलटून देखील वाहने रस्त्यावरच उभा होती.

# अजित पवारांनी मला कृषिमंत्रिपदाची ऑफर दिली होती-ना.भुजबळ

मुंबई (सरकार): राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी विधिमंडळात माणिकराव कोकाटे रमी खेळत असल्याचा व्हिडीओ उघड केला होता. यानंतर विरोधकांनी कोकाटे यांच्या कृषीमंत्रिपदाचा राजीनामा मागितला होता. आता माणिकराव कोकाटे यांची कृषिमंत्रीपदावरून उचलबांगडी करण्यात आली असून त्यांच्याकडे क्रीडा आणि युवक कल्याण विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.

दत्तात्रय भरणे यांना राज्याचे नवे कृषिमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. एकीकडे माणिकराव कोकाटे यांच्यामुळे कृषी खाते राज्यभरात चर्चेत आलेले असतानाच आता राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी



मोठा दावा केलाय. अजित पवारांनी मला कृषिमंत्रीपदाची ऑफर दिली होती. भाजपसोबत सत्तेत आलो त्यावेळी कृषिमंत्रिपद घेण्यासाठी आग्रह करण्यात आला. अजित पवार माझ्यासाठी आग्रही होते, असे भुजबळ यांनी म्हटले आहे. छगन भुजबळ यांनी नाशिक येथे माध्यमांशी संवाद साधताना हा दावा केलाय. छगन भुजबळ म्हणाले की, ज्यावेळी आम्ही पहिल्यांदा भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत सरकारमध्ये आलो, त्यावेळेला अजितदादांनी अर्थ खाते घेतलं. त्यानंतर बाकीचे खाते माझ्यासमोर ठेवले. तुम्हाला जे खाते पाहिजे आहे ते घ्या. त्यावेळी आम्ही चर्चा केली. तेव्हा अजित पवारांनी माझ्याकडे खूप आग्रह केला होता की, कृषी खातं चांगलं आहे, हे तुम्ही घ्या. असा दावा त्यांनी केला आहे.

# बीडमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात बैठक

## बैठकीला ज्ञानेश्वरी मुंडेंसह कुटुंब उपस्थित

बीड (सरकार): परळी येथील व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात यावी या मागणीसाठी आज बीडमध्ये सकल मराठा समाजाच्या वतीने सर्वपक्षीय संघटनेची व्यापक बैठक आयोजित केली.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात बैठकीला सुरुवात झाली आहे. बैठकीला बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह सर्वपक्षीय संघटनेचे पदाधिकारी उपस्थित आहेत. महादेव मुंडे यांचे कुटुंब देखील या बैठकीला उपस्थित आहेत.



# आजपासून लागू झाले यूपीआयचे नवे नियम

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) जर तुम्ही मोबाईल फोनवरील ॲपच्या माध्यमातून एखाद्याला पैसे ट्रान्सफर करत असाल किंवा कोणत्याही वस्तूंच्या खरेदीसाठी पैसे देत असाल, तसंच इतर कोणत्याही आर्थिक व्यवहारासाठी पेमेंट ॲपचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्वाची आहे. नॅशनल पेमेंटकॉर्पोरेशन ऑफ इंडियानं आजपासून आपल्या युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसमध्ये महत्त्वपूर्ण बदल केलेत. या यूपीआयच्या माध्यमातून फायनान्शियल ॲपवरून पेमेंट केले जाते. हे बदल आजपासून देशभरात लागू झालेत.




जर तुम्हाला एखाद्याचा फोन आला की मला पैसे पाठव, तर अशा वेळी तुमच्या मनात एक प्रश्न येतो की आपल्या अकाऊंटमध्ये पैसे आहेत की नाहीत? त्यावेळी तुम्ही अकाऊंट ओपन करता आणि बॅलन्स चेक करता. असं तुम्ही अनेकदा करत असाल. यावर कोणतेही निर्बंध नव्हते. पण आजपासून तुम्ही दिवसातून जास्तीत जास्त ५० वेळाच बॅलन्स चेक करू शकाल. एवढंच नाही तर तुम्ही तुमच्या बँक खात्याची लिस्टही दिवसातून फक्त २५ वेळा पाहू शकाल. असं म्हटलं जातं की, काही ग्राहक दिवसा केवळ स्वतःचं मनोरंजन करण्यासाठी यूपीआयमधून बॅलन्स तपासत असत. यामुळे यंत्रणेवरही कंजेशनची समस्या निर्माण होत होती. म्हणूनच त्यात बदल केला जात आहे.

ऑटोपेबाबतही एक महत्त्वाचा बदल झाला आहे. तुमचे EMI, SIP आणि OTT सबस्क्रिप्शन सारखे UPI ऑटोपे व्यवहार आता फक्त नॉन-पीक अवर्समध्येच प्रोसेस केले जातील. या वेळा आहेत: सकाळी १० वाजण्यापूर्वी, दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत आणि रात्री ९:३० नंतर. याचा अर्थ असा की जर तुमचं नेटफ्लिक्सचं बिल सकाळी ११ वाजता कापलं जात होते, तर आता ते लवकर किंवा नंतर कापलं जाऊ शकतं. म्हणून, पेमेंट फेल होऊ न

# जायकवाडीतून गोदावरी पात्रात पाण्याचा विसर्ग;नागरीकांना सतर्कतेचा इशारा

गेवराई (सरकार) जायकवाडी धरणातील जलसाठा समाधानकारक झाल्याने शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५ रोजी धरणाचे १८ - दरवाजे अर्ध्या फुटाने उघडून गोदावरी नदी पात्रात ९,४३२ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर गोदाकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सध्या जायकवाडी धरणात ९१% पाणीसाठा असून, वरून १६,१२३ क्युसेकने पाण्याची आवक सुरू आहे. गेल्या आठवड्यापासून पाण्याची ही सतत वाढणारी आवक, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसाचे परिणाम असून, पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या ५ वर्षांत चौथ्यांदा धरण भरले असून, यंदा पावसाळा समाधानकारक ठरल्याची माहिती कार्यकारी अभियंता प्रशांत संत यांनी दिली.

धरणाचे दरवाजे उघडण्यापूर्वी



जलसंपदामंत्री यांच्या हस्ते जलपूजन होणार असून, त्यानंतर पाण्याचा विसर्ग सुरू केला जाईल, यावेळी नदीकाठच्या राक्षसभुवन, गुळज, पांचाळेश्वर, सावळेश्वर, खामगाव, आगर नांदूर, गंगावाडी, राजापूर आदी गावांतील नागरिकांना विशेष सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

धरणाचा जलप्रवाह नियमानुसार नियंत्रणात ठेवण्याचे काम सुरू असून, कुठलीही जीवितहानी होऊ नये यासाठी प्रशासन सज्ज आहे. जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, पोलीस यंत्रणा व पथके सतर्क ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. जायकवाडी धरण हे मराठवाड्याच्या पाणी पुरवठ्याचे प्रमुख स्रोत असून, धरणाच्या व्यवस्थापनात नेमकेपणा व पारदर्शकता ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन देखील यावेळी करण्यात आले आहे.

पाण्याचा विसर्ग झाल्यानंतर गोदावरी नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होण्याची शक्यता असल्यामुळे नदीकाठच्या तळवाटीतील नागरिकांनी सावधगिरी बाळगावी. घराबाहेरील साहित्य, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, मोटारी, गुरे-ढोरे, शेती साहित्य इ. सुरक्षित ठिकाणी हलवावे. विद्युत उपकरणांची काळजी घेण्यात यावी व नदी पात्रात कोणीही उतरू नये, असे स्पष्ट आदेश प्रशासनाने दिले आहेत. आपत्ती व्यवस्थापन पथक, पाणी पोलिस व स्थानिक प्रशासनाशी तातडीने संपर्क साधण्याची सूचना करण्यात आली आहे.

# संपादकीय

## भाजपची पुढची तयारी

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये पुण्यातील राजकारणावर काँग्रेस पक्षाचा ठसा होता. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही दशकांत काँग्रेस पक्ष हा राष्ट्रीय राजकारणासोबत पुण्यातील स्थानिक राजकारणातदेखील अग्रस्थानी होता. पुणे पालिका, जिल्हा परिषद तसेच विधानसभा, लोकसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसचा वरचष्मा होता. अनेक नामवंत नेते पुण्यातून काँग्रेसचे नेतृत्व करत होते. बॅ. गाडगीळ यांच्यापासून सुरेश कलमाडी यांच्यापर्यंत अनेक नेत्यांनी पुण्याच्या नेतृत्वाची धुरा वाहिली. मात्र २००० सालानंतर राजकीय समीकरणे बदलत गेली. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर काँग्रेससमोर मोठे आव्हान निर्माण झाले. तर २०१४ नंतर भाजपने जोरदार मुसंडी मारली. २०२४ची विधानसभा निवडणूक भाजपने शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादीच्या सोबतीने लढवली. मात्र, केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी २०२९ ची निवडणूक स्वबळावर लढवण्याचे संकेत आधीच देऊन टाकले आहेत. त्याप्रमाणे भाजपकडून आतापासूनच मोर्चेबांधणी करण्यात आली. ज्या मतदारसंघात भाजपचा आमदार नसेल, तिथे पक्षाचा उमेदवार तयार करायचा. त्यातूनच आपल्या पक्षाची ताकद वाढवायची, असा हा प्लॅन आहे. त्यानुसार भाजपकडून पावले टाकली जात आहेत.

अलीकडेच पुणे जिल्ह्यातील एक मोठे राजकीय घराणे भाजपच्या गळ्याला लागले. ते म्हणजे भोरचे थोपटे घराणे होय. माजी मंत्री अनंतराव थोपटे यांचे नाव एकेकाळी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत होते. काँग्रेसनिष्ठ म्हणून त्यांची ओळख होती. पण, पवारविरोधक थोपटेंना मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिली. त्यांचे पुत्र संग्राम थोपटे यांचाही भोर वेल्हा पट्ट्यात प्रभाव आहे. मागच्या निवडणुकीत त्यांचा अजितदादा गटाचे शंकर मांडेकर यांनी पराभव केला. असे असले, तरी थोपटे यांचे सर्वदूर मजबूत जाळे आहे. त्यांनी पक्षात प्रवेश केल्याने भाजपला या मतदारसंघात आपले अस्तित्व निर्माण करता येईल. धुळ्याचे माजी आमदार कुणाल पाटील यांनीही काँग्रेसला सोडचिठ्ठी देत अलीकडेच भाजपमध्ये प्रवेश केला. काँग्रेसचे माजी मंत्री रोहिदास पाटील यांचे ते पुत्र आहेत. त्यांचा २०२४च्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाला होता. भाजपच्याच उमेदवाराने त्यांना हरवले असले तरी त्यांचा जिल्ह्यावरचा प्रभाव बघून त्यांना पक्षात घेतले आहे. याशिवाय नाशिकमध्ये अंतर्गत विरोध असतानाही सुधाकर बडगुजर यांना भाजपमध्ये घेण्यात आले. राष्ट्रवादीचे माजी आमदार अपूर्व हिरे यांनाही भाजपमध्ये घेण्यात आले.

याशिवाय इंदापूरचे माजी आमदार हर्षवर्धन पाटील हेदेखील भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. पुरंदर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेसचे माजी पुणे जिल्हाध्यक्ष संजय जगताप यांचाही भाजपमध्ये वाजतगाजत पक्ष प्रवेश झाला. त्यांच्या पक्ष प्रवेशाने शिंदे गटाच्या विजय शिवतारे यांच्यापुढे मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. संजय जगताप हे पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आहेत. मागील विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या विजय शिवतारे यांनी त्यांचा पराभव केला होता. निवडणूक निकालानंतर जगताप काँग्रेसमध्ये अस्वस्थ होते. अलीकडेच, सासवड आणि जेजुरी येथील काँग्रेसच्या काही माजी नगरसेवकांनी संजय जगताप यांची भेट घेऊन त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याची मागणी केली होती. कार्यकर्त्यांचा मोठा रेटा असल्याने जगताप भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चांना उधाण आले होते.

पुरंदर तालुक्यात काँग्रेस पक्षावर माजी आमदार संजय जगताप यांच्या कुटुंबाची मजबूत पकड आहे. त्यामुळे त्यांनी काँग्रेसची साथ सोडल्याने जिल्ह्यातून पक्ष जवळपास हद्दपार झाल्यात जमा आहे. संजय जगताप यांच्या भाजप प्रवेशामुळे पुरंदर तालुक्यात भाजपला मोठे राजकीय बळ मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना, भाजप आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसची 'महायुती' सत्तेत आहे. जगताप यांच्या प्रवेशामुळे येत्या काही महिन्यांत होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका यांच्या निवडणुकांमध्ये भाजपला मोठा फायदा होऊ शकतो. अनेक वर्षांपासून पुरंदर तालुक्यात सत्तेची स्वप्ने पाहणाऱ्या भाजपला संजय जगताप यांच्या माध्यमातून एक मजबूत आधार मिळण्याची संधी निर्माण झाली आहे.

**बारामतीला वेढा अन् जिल्ह्यात सर्वपक्षीयांना शह**

बारामती लोकसभा मतदारसंघात भोर-वेल्हा, खडकवासला, इंदापूर, बारामती, पुरंदर व दौंड अशा सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. भाजपने या सर्वच्या सर्व मतदारसंघात आपला प्रभाव वाढवला आहे. काँग्रेसचे दोन बडे मोहरे टिपून भाजपने बारामती लोकसभेत सुप्रिया सुळे यांच्यापुढे मोठे आव्हान उभे केले. त्याचबरोबर पुणे जिल्ह्यातदेखील भाजपने सर्वपक्षीयांना मोठा शह दिला आहे.

पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष संजय जगताप यांनी देखील भाजपची वाट धरल्याने पुणे जिह्यात काँग्रेस पक्षाला आणखी एक धक्का बसला. एकेकाळी पुणे जिल्ह्यावर काँग्रेस पक्षाचे मोठे वर्चस्व होते. मात्र आता पक्षाला जिल्ह्यात गळती लागल्याचे दिसते. यातूनच भाजपाने २०२९ ची विधानसभा निवडणूक स्वबळावर लढविण्याची तयारी सुरू केल्याचे मानले जात आहे. शिवाय या माध्यमातून बारामतीभोवतीचा वेढाही अधिक घट्ट करण्याची भाजपची रणनीती असल्याचेही दिसून येते.

## सतत मूड बदलण्याची 'ही' वैज्ञानिक कारणं - डॉ.जगदीश टेकाळे

आजच्या धावपळीच्या जीवनात बहुतेक लोक तणावाचे बळी ठरत आहेत. कामाचा ताण, आर्थिक अडचणी, नात्यांमधील समस्या, कौटुंबिक वाद अशा अनेक कारणांमुळे तणाव वाढतो, पण काही लोकांचा मूड क्षणाक्षणाला बदलत असतो, ज्याला आपण मूड स्विंग्स म्हणतो, अशावेळी चिडचिडेपणा जाणवू लागतो आणि हे असे का होत आहे. हेच समजत नाही. कधी कुणाशी बोलावंसं वाटतं, तर दुसऱ्याच क्षणी बोलायची इच्छा होत नाही. अचानक राग येतो, तर कधी तुम्ही खूप प्रेमाने वागता. अनेकदा लोकांना ही परिस्थिती समजत नाही, पण तुमच्या शरीरात किंवा वागणुकीत होणाऱ्या कोणत्याही बदलामागे एक वैज्ञानिक कारण नक्कीच असते. मूड खराब होण्यामागे नेमकी कोणती वैज्ञानिक कारणे आहेत. याबाबत तज्ज्ञांनी सांगितलेली ही काही महत्त्वाची कारणे.

१) सेरोटोनिन आणि डोपामाईलची पातळी: डे दोन्ही मेंदूतील फॉल-गुड हार्मोन्स म्हणून ओळखले जातात, तणाव, अपुरी झोप किंवा चुकीच्या आहारामुळे या हार्मोन्सची पातळी कमी झाल्यास मूड खराब होऊ शकतो.

२) अपुरी झोप: जेव्हा आपल्याला पुरेशी झोप मिळत नाही, तेव्हा मेंदूला आराम मिळत नाही. यामुळे चिडचिड, थकवा आणि राग येणे स्वाभाविक आहे.

३)हार्मोनल बदल : विशेषतः महिलांमध्ये मासिक पाळी, गर्भधारणा किंवा मेनोपॉजच्या काळात हार्मोन्समध्ये मोठे बदल होतात है बदल थेट त्यांच्या मूडवर परिणाम करतात.

४)चुकीचा आहार : जर तुम्ही तुमच्या आहारात जास्त साखर, प्रक्रिया केलेले पदार्थ किंवा कॅफीन घेत असाल, तर राक्तातील साखरेची पातळी वेगाने कमी-जास्त होते याचा थेट परिणाम आपल्या मूडवर होतो.

५)व्हिटॅमिन डीची कमतरताः पुरेसा सूर्यप्रकाश न मिळाल्यास शरीरात व्हिटीमन डीची कमतरता निर्माण होते. यामुळे मेंदूतील सेरोटोनिनची निर्मिती कमी होते आणि नैराश्यासारखी भावना येऊ शकते, ज्यामुळे तुमचा मूड सतत खराब राहतो.

६) चिंता आणि तणाव : सतत चिंता किंवा तणावाखाली राहिल्याने शरीरात कॉर्टिसोल नावाचा स्ट्रेस हार्मोन वाढतो. हा हार्मोन मेंदूला थकवतो आणि मूड खराब करतो.

मूड स्विंग्सवर नियंत्रण कसे मिळवावे ?

* दररोज काही वेळ सूर्यप्रकाशात बसा.
* नियमितपणे योग आणि ध्यान करा.
* हलका व्यायाम किंवा चालण्याचा सराव करा.
* सकस आणि संतुलित आहार घ्या.
* मित्र-मैत्रिणींशी किंवा जवळच्या व्यक्तीशी संवाद कायम ठेवा.
* तुमचे आवडते संगीत ऐका.
* दररोज ७ ते ८ तासांची शांत झोप घ्या.

असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई (गवते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.



डॉ.जगदीश टेकाळे

मो. 9518551503


मो. 9545615352

## गर्भारपणात सौंदर्य टिकवण्याचे काही उपाय



गर्भारपणात स्त्रीच्या चेहऱ्यावर वेगळंच तेज दिसतं. ती उत्साही आणि आकर्षक दिसते. पण सध्याच्या प्रदूषणयुक्त वातावरणात हे तेज हरवू शकतं. म्हणून गर्भारपणात सौंदर्य टिकवण्याचे काही उपाय योजायला हवेत. या काळात महिलांची त्वचा डी-हाइड्रेड होण्याचा धोका असतो. पोटावरील त्वचा ताणल्यामुळे सुरकुत्या पडण्याचा धोका असतो. म्हणूनच नियमितपणे मसाज करणं आवश्यक आहे. घराबाहेर पडताना सन प्रोटेक्शन क्रीमचा वापर करावा. डोकं झाकावं. बाहेर पडताना पाण्याची बाटली बरोबर असावी. या दिवसात फ्रूट ज्यूस घेण्यापेक्षा पेरू, सफरचंद, संत्री-मोसंबी आदी फळांचं सेवन वाढवावं. यामुळे आरोग्य सुधारतंच त्याचप्रमाणे त्वचेची टवटवीही टिकून राहते. आहारात हिरव्या भाज्या, बिन्स, प्रोटीनयुक्त पदार्थ आणि दह्याचा समावेश असावा. गर्भारपणात संप्रेरकांमध्ये बदल होत असल्याचा परिणाम त्वचेवर स्पष्ट दिसतो. यामुळे केसांवरही दुष्परिणाम जाणवतो. सुरुवातीच्या काही दिवसांतच केस गळण्याचा अथवा केसांचा पोत खालवण्याचा धोका असतो. म्हणूनच केसांचीही काळजी घ्यायला हवी.

## वाट शोधा, पळवाट नको!



अनेक महिलांना नवरा सोडण्यासाठी, त्याच्यावर केस करण्यासाठी किंवा त्याचा बदला घेऊन त्याला आणि सासरच्यांना अद्दल घडवण्यासाठी माहेरून पूर्ण पाठिंबा दिला जातो. त्यावेळेस महिलेला आपल्या माहेरील लोकांचा अभिमान वाटतो. मोठा सीन बनून, त्याला तिखट-मीठ लावून नवऱ्याला जास्तीत जास्त कायदेशीर त्रास कसा देता येतो, याचा सल्ला अनेक असे नातेवाईक देतात. ज्यांना कायद्यातील कोणतंही ज्ञान नसतं. महिला माहेरी आली की, परिस्थिती समजून न घेता तिला जास्तीत जास्त भडकावून देणारे आई-वडील आपल्या मोठमोठ्या ओळखी, पैसा, वेळ वापरून लढाईची जय्यत तयारी करतात. त्यावेळी महिला स्वतः मानसिक, भावनिक खचलेली असल्यामुळे तिला स्वतःला योग्य-अयोग्य समजत नसतं.

सासरी कोणताही वाद, भांडण झालेच किंवा खरंच कोणताही त्रास झाला तरी त्यावर एकमेव उपाय माहेरी निघून येणे, हा नक्कीच नाहीये. आपल्याला नातं सावरायला, बिघडलेल्या संवादांना नवसंजीवनी द्यायला अनेकदा अनेक पर्याय उपलब्ध असतात; परंतु त्या वेळी महिला आणि तिचे माहेरचे लोक, विशेषतः तिची आई हे तात्पुरता आणि वरवरचा विचार करतात. खासकरून नवीन लग्न झालेल्या मुलींना काहीच अनुभव नसतो. दुनियादारी माहिती नसते. या मुलींना स्वतःला आयुष्यात काय हवं आहे, काय करायचं आहे, हे समजण्याची विचारशक्ती नसते. त्यावेळी जबाबदारीने तीच आयुष्य कसं सावरायचं, हे आई-वडिलांना कळणं महत्त्वाचे आहे.

मुलीला माहेरी ठेऊन घेणे म्हणजे तिच्यावर खूप प्रेम आहे, असा त्याचा अजिबात अर्थ होत नाही. मुळात आपल्या मुलीचा सासरी काय प्रॉब्लेम होतोय, नेमके कोण चुकतेय, कशामुळे वादविवाद होतात, यांच्या मुळाशी न जाता फक्त मुलीच्या तोंडून ऐकलेल्या माहितीवर आणि आधारावर तिच्या आयुष्याचा निर्णय तिचे आई-वडील घेतात.

या माहेरवासाची सुरुवात खरं तर, सासरी नांदत असतानाच झालेली असते. सासरच्या छोट्या-छोट्या तक्रारी माहेरी सांगत राहणे, सासरच्या लोकांच्या फक्त नकारात्मक सवयी अथवा स्वभाव याचीच माहेरी चर्चा करणे, यामुळे आपण माहेरच्या मंडळींचे मत आधीच कलुषित करून ठेवलेलं असतं. दोन्ही घरांमधील समन्वय साधणं, ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी नवविवाहितेला पार पाडावी लागते. कारण याच दोन्ही कुटुंबांना आयुष्यभर एकमेकांशी समजून-उमजून वागायचं असत. लग्न फक्त नवरा-नवरीचं नसतं, तर ते दोन कुटुंबांचं असतं.

आपणच सासरी असताना माहेरी सगळ्या परिस्थितीबाबतीत तयार केलेली पार्श्वभूमी आपल्याला पुढील कसोटीच्या प्रसंगी उपयोगी येणार असते. वाद-विवाद, मतभेद प्रत्येक कुटुंबात असतात. आवडी-निवडी, सवयी या आपल्या आणि आपण जिथे लहानाचे मोठे झालो तरी तेथील लोकांशी जुळणाऱ्या नसतात.

तरी देखील प्रत्येक महिलेला जेव्हा कधी सासर सोडून कायमच माहेरी राहायला येणं हा एकमेव पर्याय निवडावासा वाटतो आणि माहेरी राहणं हेच प्रत्येक समस्येचं सोल्यूशन आहे असे वाटते, तेव्हा थोडं थांबून विचार करा. आजचा, उद्याचा नाही, तर भविष्याचा विचार करा. आपल्याला जमत नसेल, तर अतिशय विश्वासू जवळच्या माणसांचा सल्ला घ्या, कौटुंबिक कायदे आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण समजावून घ्या किंवा समुपदेशकांची मदत घ्या, पण आपल्या आयुष्याचे निर्णय इतर कोणीही त्याच्या सोयीने घेईल, मग ते आई-वडील असोत, भाऊ-बहिणी असोत वा नातेवाईक किंवा मित्रमंडळी असे होऊ देऊ नका. स्वतःच्या समस्यांची जबाबदारी स्वतः घ्या, सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवा, वाट शोधा, पळवाट शोधू नका. विचार करा, केलेला विचार तपासून बघा. मग निर्णय घ्या, तो निर्णय चांगला की वाईट याहीपेक्षा आपल्याला आगीतून उठून फुफाट्यात पडणारा नाही ना, याची शहानिशा जरूर करा.

## शरीर साक्षात परमेश्वर

अनंत कोटी ब्रह्मांड, अनंत रूपे अनंत वेषे अशी परमेश्वराची रूपे आहेत. अनंत कोटी ब्रह्मांड म्हणजे मोजताही येणार नाही इतकी अगणित ब्रह्मांड आहेत. आपल्या सूर्यासारखे अनंत सूर्य आहेत असे आता शास्त्रज्ञ सांगत आहेत. आपल्याला एकच सूर्य माहीत आहे. अनेक ग्रह आहेत. अनेक उपग्रह आहेत. हे सगळे ज्याने निर्माण केले, जिथून निर्माण झाले तो परमेश्वर. त्याने असे कधी म्हटले आहे का की हे मी निर्माण केले. हे सगळे ऐश्वर्य माझे आहे असा अहंकार त्याने कधी केला आहे का ? हे सगळे ऐश्वर्य, हा निसर्ग हे सर्व काही माझे आहे असा अहंकार तो कधी करत नाही. त्याच्या ठिकाणी इतके ज्ञान आहे, इतके दिव्य ज्ञान आहे पण मी ज्ञानी आहे असे कधी तो म्हणत नाही. नाहीतर आपल्याकडे नुसता पदवीधर झाले तरी मी कुणीतरी मोठा असे समजायला लागतो. अरे पण त्या परमेश्वराच्या ठिकाणी ज्ञान, दिव्य ज्ञान इतके आहे की आपल्याला त्याची कल्पनाही करता येणार नाही. जसे त्याचे बाकी सर्वच अनंत आहे तसे त्याच्या ठिकाणी असलेले ज्ञानही अनंत आहे. एवढे ज्ञान त्याच्या ठिकाणी असूनसुद्धा त्याला त्याचा अहंकार नाही. तुम्ही म्हणाल त्याच्या ठिकाणी ज्ञान आहे हे कशावरून ? जगांत सर्व ठिकाणी व्यवस्था आहे यावरून. जगांत जी सर्व ठिकाणी व्यवस्था आहे ती जरी पाहिली तरी त्याच्या ठिकाणी असलेल्या ज्ञानाची, दिव्य ज्ञानाची तुम्हाला कल्पना येईल. आपल्या शरीराकडे जरी पाहिले तरी आपल्याला त्याची कल्पना येईल. आपण आपल्या शरीराकडे जसे कौतुकाने पाहायला हवे तसे पाहत नाही. आपल्या शरीरात जी व्यवस्था आहे ती पहिली तरी डोळे, नाक, कां, एकेक अवयव म्हणजे सुंदर अशी व्यवस्था आहे. दात तोंडात उमलतात कसे ? जशी एखादी कळी उमलावी तसे हे दात तोंडात उमलतात. जीभ, पडजीभ, हिरड्या हे सर्व येतात कुठून ? कळी उमलावी तसे हे तोंडात सर्व उमलत जाते. तिथे काहीही अव्यवस्था नाही. सगळी सुंदर अशी व्यवस्था आहे. आपल्या शरीराकडे जरी पहिले तरी आपले शरीर ही दिव्य व्यवस्था आहे म्हणून मी शरीर साक्षात परमेश्वर असा सिद्धांत मांडला. शरीराचे बाह्यांग इतके दिव्य आहे. अंतरंग सोडाच, बाह्यांगच इतके दिव्य आहे. आत गेलात तर ते हृदय, यकृत, फुफुसे , किडनी, ते रक्त कसे निर्माण होते ? रक्ताचा पुरवठा कसा होतो ? यांत किती व्यवस्था आहे हे पाहिले तर हे सर्व दिव्य आहे. हे कुणीही मी निर्माण केले असे म्हणू शकत नाही. रक्त मी निर्माण केले असे आपण म्हणू शकतो का ? रक्ताचे अभिसरण मी करतो असे आपण म्हणू शकत नाही. कारण हे सर्व आपोआप चाललेले आहे.

## जीवनात झाड व्हा !



लहान मुलांना मोठी माणसे नेहमीच एक प्रश्न विचारतात. कोणता ते ओळख पाहू! तू मोठेपणी कोण होणार? तुला कोण व्हावेसे वाटते? दोन ते चार वयोगटातील मुलाला हा प्रश्न विचारला तर त्याच्या अवतीभवती वावरणाऱ्या माणसात रुबाब, आकर्षण व मान, अधिकार यापैकी काही अनुभवाने आढळल्यास तो चटकन म्हणेल, ''मी बँडवाला होणार,'' ''मी मोटारवाला होणार, 'मी बाई होणार', मी पोलीस मामा होणार वगैरे, वगैरे. त्या अजाण वयात अशीच उत्तरे नकळत दिली जातात. थोडं मोठं झाल्यावर मी डॉक्टर होणार, मी बाई होणार अशी मुलं सांगतात. कारण काय ठाऊक आहे? तर म्हणतात, आई-बाबा म्हणतात म्हणून, आजोबांची इच्छा आहे म्हणून किंवा शाळेत शिक्षक सांगतात म्हणून !! म्हणजे आपल्याला नक्की कोण व्हावेसे वाटतं ते तसंच का वाटतं हे छोट्यांना नीट सांगता येत नाही. आठवा बरं, आपल्या शाळेतली वेशभूषा स्पर्धा. जास्तीत जास्त मुली बाई होत असतात आणि मुलं डॉक्टर. मी मात्र तुम्हाला सांगेन की, जीवनात काहीही व्हायचं ठरवा, ते साध्य करण्यासाठी भरपूर प्रयत्न करा, कष्ट घ्या, सैनिक होऊन देश रक्षा करा, डॉक्टर होऊन जीव वाचवा, उद्योजक होऊन एखाद्याला काम द्या, समाजसेवक होऊन समाजहित करा, पण हे सारं करताना तुम्ही जीवनात झाड व्हा हा मंत्र ध्यानात ठेवा.

ऊन, पाऊस, वादळ, वारा, बदलते ऋतू, कडाडती वीज या साऱ्यांना हसतमुखाने सामोरे जात आव्हानं स्वीकारत, खंबीरपणे, ताठ, डौलात, स्थिर बुद्धीने उभे असलेले झाड किती परोपकारी संतांप्रमाणे असते बरे! त्याच्या जीवनाचा प्रत्येक भाग परहितार्थ श्रमत, कष्टत असतो. झाड आपल्याला थकलेल्या पांथस्थाना आश्रय देतं, छाया देतं, सुगंधीत फुलं, सुमधुर रसाळ फळ हे झाडच आपल्याला भरभरून देत राहतं. पक्षी झाडाच्या फांद्यांवर विसावा घेतात, बागडतात, आपली घरटी बांधून झाडाच्या आधाराने आश्रयाने गुण्यागोविंदानं राहतात. देता व्हाचा संदेश झाड आपल्याला देतं. संकटांना भिऊ नका, डगमगू नका, आपली जागा सोडू नका, कर्तव्यात कसूर न करता दक्ष राहा हेच जणू झाड आपल्या आचरणातून सांगतं, सुचवतं, दुःख पचवा, संकटं पेलून धरा, सुखात ताठा, गर्व नको असंच जणू हे झाड आपल्याला सांगतं.

आळसाने आडवं झालेलं झाड, निराशाने पळून जाणारं झाड तुम्ही कधी पाहिलं आहे का? नाही ना? म्हणूनच या झाडाचा आदर्श ठेवून आपण झाड व्हायला हवं. मानवाच्या आयुष्यात अनेक प्रतिकात्मक मार्गदर्शन करणारे घटक निसर्गात आहेत. त्यापैकी झाड हे एक अत्यंत सशक्त आणि प्रेरणादायी प्रतीक आहे. जीवनात झाड व्हा हा उपदेश आपण प्रत्यक्ष अनुभवावर आधारित घेतल्यास, तो आयुष्याला सकारात्मक दिशा देतो.

झाडाचे गुणधर्म – जीवनासाठी प्रेरणा

१. मूक सेवा आणि नि:स्वार्थ दान

झाड कधीही आपल्या फळांची जाहिरात करत नाही. ते गारवा देतं, सावली देतं, फळं देतं, ऑक्सिजन देतं – आणि हे सर्व नि:स्वार्थपणे.

उपदेश : आयुष्यात काही मिळवलं तरी त्याचा गर्व न करता, ते इतरांसाठी उपयोगी पद्धतीने वापरा.

२. मुळांवरचा विश्वास

झाड जितकं उंच जातं, तितकं त्याचं मुळांवरचं अवलंबित्व वाढतं.

उपदेश : माणसाने कितीही मोठं झालं, तरी आपली मुळे म्हणजे आपले संस्कार, कुटुंब, मातृभूमी, हे विसरू नयेत.

३. संकटातही उभं राहणं

वाऱ्याचे, पावसाचे, उन्हाचे वारे झेलूनही झाड ताठ उभं असतं.

उपदेश : संकटं आयुष्यात येणारच, पण त्यांच्यासमोर न झुकता, ठामपणे उभं राहणं हेच खऱ्या आयुष्याचं लक्षण.

४. दुसऱ्यांना आधार देणं झाडाखाली माणसं बसतात, पशु-पक्षी विसावतात, प्रेमाने नांदतात.

उपदेश : आपणही असं झाड व्हावं, ज्याच्या सावलीत इतरांना आधार, शांती आणि प्रेरणा मिळते.

५. फळांनी झुकणं

झाडाला जितकी फळं लागतात, तितकं ते झुकतं – विनयाने.

उपदेश : ज्ञान, यश, श्रीमंती वाढली की नम्रता वाढावी, गर्व नव्हे.

झाड म्हणजे केवळ एक वनस्पती नाही, ती एक जीवनशैली आहे. झाड होणं म्हणजे- इतरांसाठी उपयुक्त होणं, संकटांना सामोरं जाणं, मुळाशी नातं जपणं, जीवनभर देत राहणं.

जीवनात झाड व्हा ही केवळ ओळ नाही, ती एक आचारधर्म आहे. आपण झाडासारखे जगलो, तर समाज, पर्यावरण आणि मानवी नाती अधिक समृद्ध होतील. फुला-फळांनी, गारव्याने, सेवाभावाने आपणही आयुष्याला अर्थ देऊ शकतो.

फक्त सावली देणं हेच झाडपण नाही, तर दुसऱ्यांना उभं राहण्यासाठी मूळ बनणं हेही झाड होण्याचं खर सामर्थ्य आहे. जीवनात झाड व्हा, हे आचारात दिसू द्या.

# विशेष वृत्त

## गुरु आऊटडोअर्स इंडियाच्या कायदेशीर सल्लागार पदी ॲड.अक्षय मुळे

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी):–** गुरु आऊटडोअर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या जाहिरात क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने आज ॲड. अक्षय विश्वंभर मुळे यांची कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. याबाबतचा औपचारिक करार आज दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी करण्यात आला आहे. या करारानुसार, ॲाड. मुळे हे कंपनीसाठी विविध कायदेशीर सेवा प्रदान करणार असून, करारनाम्यांचे ड्राफ्टिंग, कायदेशीर सल्ला, न्यायालयीन व प्रशासकीय कामकाजात प्रतिनिधित्व आदी जबाबदार्या पार पाडणार आहेत. कंपनीने व्यवसायातील गोपनीयता व हितरक्षणासाठी कडक अटी ठरवल्या आहेत.तसेच सर्व अधिकृत संवाद फक्त लिखित स्वरूपात (ई–मेल किंवा पत्राद्वारे) होणार आहे. या करारामुळे कंपनीला व्यावसायिक गोपनीयतेचे संरक्षण व कायदेशीर बाबतीत सक्षम मदत मिळणार आहे. ॲड. मुळे हे बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कायदेतज्ज्ञ असून, त्यांनी विविध न्यायालयीन प्रकरणांत यशस्वी कामगिरी बजावली आहे.



## डॉ. शितल आरसूळ हिचे परीक्षेत यश

**बीड:** डॉ. शितल आरसूळ हिने एमडी आयुर्वेदाचार्यच्या नेट परीक्षेसाठी परीक्षा दिली होती. त्या परीक्षेचा निकाल लागला असून तिने एमडी अभ्यासक्रमासाठी पदवीत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शासकीय महाविद्यालयासाठी पात्र ठरली आहे. तिन्ही पाचशे पैकी ३०७ गुण घेऊन ओबीसी मराठा कुणबी प्रवर्गातून इंडिया रैंक २२२ मध्ये प्रथम आली आहे. तिची जिद्द आणि चिकाटी तिने मात्र सोडली नाही गेल्या वर्षी पेमेंट शीटमध्ये नंबर लागल्यामुळे तिने प्रवेश घेतला नाही यावर्षी शासकीय कॉलेजला नंबर लागल्यामुळे तिची जिद्द आणि चिकाटीमुळे ती एमडी आयुर्वेदाचार्य आरसूळ परिवारामध्ये उच्च शिक्षणामध्ये मन उंचावली आहे. बोरदेवी या गावात अरसुळ परिवारातील डॉ. अभिजीत आरसूळ, डॉ. वर्षा आरसुळ, डॉ. राजाभाऊ आरसूळ, डॉ. शितल अरसूळ, डॉ. अक्षय अरसूळ व रक्ताच्या नात्यातील नातेवाईक तीन डॉक्टर आहेत. उच्चशिक्षित आहेत डॉक्टर शीतल आरसोलीचा नंबर लागल्यामुळे माजी आमदार सुनील धांडे, महेश धांडे बाबू सुरवसे, राजेंद्र सुरवसे, आमदार विजयसिंह पंडित माजी आमदार लक्ष्मण पवार लक्ष्मण करंडे चंद्रकांत आरसूळ डॉक्टर राजाभाऊ आरसुळ यांचे अभिनंदन केले आहे.

## गोरक्षनाथ टेकडी येथे एसटी बस सुरु करण्याची मागणी

**बीड :** अखंड सप्ताह व श्रावणी सोमवार निमित्त बीड तालुक्यातील श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे एस.टी. बस सुरु करण्यात यावी अशी मागणी गोरक्षनाथ टेकडीच्या सेवकांनी राज्य परिवहन विभागाचे विभागीय नियंत्रक यांच्याकडे केली आहे. निवेदनात म्हटले आहे, श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाला २ ऑगस्टपासूनआरंभ होत असून सांगता ही दि. ८ ऑगस्ट रोजी होणार असून या सप्ताहाच्या कालावधीत भाविक मोठ्या संख्येने ठिकाणी येत असतात. त्यासाठी परिवहन महामंडळाने त्या ठिकाणी बस सेवा सुरु करावी व भविक भक्तांची गैरसोय टाळावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अखंड सप्ताहासाठी बीड जिल्ह्यातूनच नव्हे तर महाराष्ट्रातून भाविक या ठिकाणी येतात. टेकडी फाटा ते गोरक्षनाथ टेकडी जवळपास अडीच कि.मी.चा रस्ता आहे. बीडहून ढेकणमोहा किंवा घाटसावळी येथे महामंडळाच्या बसेस थांबतात. तेथून सहा कि.मी. पायी जावे लागते. खाजगी वाहनापासून धोका निर्माण होऊ शकतो. त्या अनुषंगाने एस.टी. महामंडळाने बीड ते गोरक्षनाथ टेकडीपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाच्या सात दिवसाच्या कालावधीमध्ये बसेस सोडल्या तर भाविक भक्तांची होणारी हेळसांड थांबेल असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देताना भाऊसाहेब डावकर, सरपंच तेजाब चव्हाण, बिभिषण जगताप, राहुल जाधव, उत्तरेश्वर जाधव, श्रीराम बुवा पुरी, अनंत थोरात आदीनी राज्य परिवहन विभागाचे विभागीय नियंत्रक यांच्याकडे दिले आहे.

## प्रतिमा कवरजी म.सा. यांचा चार्तुमास बीड शहरात होणार:अशोक लोढा

**बीड:** प.पु. महासती प्रतीभा कवरजी म.सा. यांनी आगामी २०२६ चा चार्तुमास बीड नगरीत करण्याचे निश्चित केले आहे. सध्या गोकुळवाडी (बदनापुर) येथे महासतीजीचा चार्तुमास चालू आहे अशी माहिती सकल जैन समाजाचे अध्यक्ष अशोक लोढा यांनी त्यांच्या निवासस्थानी आयोजित बैठकीत पदाधिकाऱ्यांना दिली. यावेळी चार्तुमासाचे प्रारुप ठरवण्यात आले. प. पू. महासतीजी यांना महाराष्ट्र प्रवर्तिनी या पदविने सन्मानित कार्यक्रमात पुणे येथे उपस्थित राहून त्यांना बीडला आगामी चार्तुमास देण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच दि. ७ जुलै रोजी ५० समाजबांधवांनी गोकुळवाडी (बदनापुर) येथे जावून विनंती केली होती. दरम्यान सकल जैन समाज बीड यांच्या प्रयत्नाला यश आले असून आगामी चार्तुमास बीड येथे देण्याचा शब्द महासतीने दिल्याने बीड जैन समाजामध्ये आनंद व्यक्त करण्यात आला. या गतीविधित व गुरूरू गणेश पंच परमेष्ठी ग्रुप बीड, बालाघाट यांचा मोठा सहभाग लाभला.

# जन्म मृत्यू नोंदणीसाठी लागणारे अनुपलब्धता प्रमाणपत्र नागरिकांनी काढून घ्यावे - जय.डी.शाह

**बीड (प्रतिनिधी):–** उशिरा जन्म व मृत्यू नोंद केल्यामुळे प्रमाणपत्र देण्यावर लावण्यात आलेली स्थगिती उठविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून जन्म–मृत्यू नोंदणीसाठी आता नवीन कार्यपद्धती निश्चित केली आहे. यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून उशिराने नोंदणी करणाऱ्यांना आवश्यक त्या पुराव्यांची पडताळणी करावी लागणार आहे. त्यामुळे वेळेतच जन्म–मृत्यू नोंदणी करणे सोयीचे ठरणार आहे. यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व सामान्य नागरिकांनी जन्म मृत्यू नोंदणीसाठी प्रथमदर्शनी अतिशय आवश्यक असणारे नोंद नसल्याचे अनुपलब्धता प्रमाणपत्र आपल्या जवळच्या नगर परिषद , नगर पंचायत, ग्रामपंचायत मधुन काढून घ्यावे त्याशिवाय तुम्हाला जन्म मृत्यू नोंदणी अर्ज करता येणार नाही. असे आवाहन समाजसेवक जे.डी. शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.



पत्रात पुढे म्हटले आहे की परदेशी नागरिकांना बनावट जन्म प्रमाणपत्रे वितरित केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ८ जानेवारी रोजी गृहविभागाने विशेष तपास समिती (एसआयटी) स्थापन केली. या समितीने अनेक तक्रारींची चौकशी केली. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने २१ जानेवारी रोजी आदेश काढून विलंबित जन्म–मृत्यू प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेला तात्पुरती स्थगित दिली होती. ती स्थगिती आता उठविण्यात आली आहे. जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ आणि सुधारित अधिनियम २०२३ नुसार जन्म–मृत्यूच्या विलंबित नोंदणी प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या होत्या. पूर्वी, जन्म किंवा मृत्यूची नोंद एक वर्षाच्या आत न झाल्यास प्रथमवर्ग दंडाधिकारी किंवा शहर दंडाधिकाऱ्यांच्या आदेशावरून नोंदणी केली जात असे. मात्र, केंद्र सरकारने ११ ऑगस्ट २०२३ रोजी यात सुधारणा करत जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांना अधिकृत केले होते. नागरिकांना शाळा प्रवेश, पासपोर्ट, सातबारा उतारा, शैक्षणिक आणि इतर महत्त्वाच्या कामांसाठी जन्म व मृत्यू प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. मात्र, विलंबित प्रमाणपत्र न मिळाल्याने अनेकांना अडचणी येत होत्या. सार्वजनिक आरोग्य विभागाने १२ मार्च रोजी नवीन कार्यपद्धती निश्चित करत, विलंबित नोंदणी प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि सुटसुटीतपणा आणण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रक्रियेत बनावट प्रमाणपत्रे वाटप टाळण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात येणार आहे. पत्रात शेवटी म्हटले की शासनाच्या या निर्णयामुळे हजारो नागरिकांना दिलासा मिळणार असून, विलंबित जन्म–मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार असल्याचे सांगितले.आता नवीन कार्यपद्धतीनुसार जन्म–मृत्यू नोंदणीसंदर्भात निबंधक, जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय अधिकारी, कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमक्ष सबळ पुराव्याची खातरजमा केली जाईल. आवश्यक त्या पुराव्यांची पडताळणी केली जाईल.नोंद घेण्यास एका वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यास पुराव्यांसह अर्जदारांची वंशावळ, त्यांना ओळखणारे शासकीय अभिलेखे व शासकीय दस्त ऐवजांची तपासणी करूनच नोंद होणार आहे. यासाठी प्रथमदर्शनी नोंदणीसाठी लागणारे (जन्म मृत्यू नोंद नसल्याचे) अनुपलब्धता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे हे प्रमाणपत्र नसले तर तुम्हाला जन्म नोंदणीचा अर्ज करता येणार नाही असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी केले आहे.

## भाग्यश्री सगट हिचे वक्तृत्व स्पर्धेत यश

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):–** तालुक्यातील देवळा येथील विश्वरुपी माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी भाग्यश्री सगट हिने वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, वरवटी येथे संपन्न झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

दि. २९ जुलै रोजी पार पडलेल्या या वक्तृत्व स्पर्धेत भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एका क्रांतिकारकाचे योगदान या

विषयावर तिने अत्यंत प्रभावीपणे आपले विचार व्यक्त करून उपस्थितांची व परिक्षकांची मने जिंकली. रोख रक्कमेचे पारितोषिक देवून आयोजकांच्या वतीने तिला सन्मानित करण्यात आले. यासाठी तिला शाळेतील शिक्षक हनुमंत आपेट यांनी मार्गदर्शन केले. तिच्या या यशाबद्दल तिचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# डांबरीकरण रखडल्याने पिंपळवंडी-कुसळंब रस्त्याची झाली दूरवस्था

### कंत्राटदारासह सा.बां. विभागाने खडीचे [illegible] करून [illegible] करण्याची ग्रामस्थांची मागणी

**पिंपळवंडी (प्रतिनिधी):–** पाटोदा तालुक्यातील कुसळंब ते पिंपळवंडी दरम्यान असलेल्या धोपटवाडी ते कुसळंब घाटातील प्रमुख रस्त्याचे मागील काही महिन्यपासून काम चालू आहे. डांबरीकरणासाठी घाटात रस्त्याच्या एका बाजूने मोठे दगड आणून त्याची खडी तयार केली आहे. मात्र त्या खडीचे ढिगारे रस्त्यावर पडलेले आहे. त्यामुळे या ठिकाणाहून जाणाऱ्या शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह, ग्रामस्थ शेकऱ्यांना हाल सहन करावे लागत आहेत. संबंधित कंत्राटदार आणि सा.बां. विभागाने तातडीने या खडीचे सपाटीकरण करून रस्त्याचे डांबरीकरण करावे व रस्ता वाहतुकीस मोकळा करावा अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

कुसळंब घाटातील रस्ता दुरुस्तीचे काम सुरू झाल्यापासून पिंपळवंडी ते कुसळंब मार्गे जामखेड–पाटोदा या ठिकाणी जा– ये करणारी वाहनांची वाहतूक व रहदारी कमी झालेली आहे. जड–अवजड वाहनाप्रमाणे सामान्यांची लालपरी एसटी तसेच मालवाहतुकीचे साधन टेम्पो, ट्रक हे वाहने सुद्धा या मार्गावरून दळणवळणासाठी बंद असल्याने पिंपळवंडी येथील विद्यालयात शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती एस.टी. ने सवलत दरात प्रवास करणाऱ्या महिला–पुरुषांची तसेच आजारी व्यक्तींची खूपच हेळसांड व गैरसोय होत आहे. याच रस्त्याने पिंपळवंडी–अंमळनेर–कोतन–खोपटी–भडकेल व परिसरातील वाडी–वस्त्यातील ग्रामस्थांना पाटोदा येथे सरकारी कामानिमित्त प्रत्येक महत्त्वाच्या कार्यालयात जा–ये करावे लागते. तसेच जामखेड हे मुख्य बाजारपेठ व या ठिकाणी अनेक गंभीर आजारावर उपचार करणारे दवाखाने असल्याने या परिसरातील जनतेचा पाटोदा व जामखेड येथे सतत संपर्क असल्याने रस्त्याच्या कासवगतीने चाललेल्या कामामुळे एसटी बसची वाहतूक बंद आहे, त्यामुळे ग्रामस्थ वैतागले आहेत. नाईलाजाने मोठी आर्थिक जळ सोसवून खाजगी वाहनांचा आधार घेऊन मोठ्या संकटाशी सामना करावा लागत आहे. म्हणून संबंधित बांधकाम विभागाने या गंभीर व ज्वलंत समस्येची दखल घ्यावी अशी मागणी वाहनचालक, ग्रामस्थ करत आहेत.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून कौटूंबिक संवाद वाढविण्याची गरज : प्रा.सुषमा कुलकर्णी

**बीड (प्रतिनिधी):** मोबाईलच्या युगात कुटुंबातील संवाद बंद होत चालले आहेत. हा समाज व्यवस्थेसाठी मोठा धोका असून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संवाद वाढविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रा.डॉ. वर्षा कुलकर्णी यांनी केले. शहरातील भाग्यनगर येथील पारनेरकर महाराज जीवनकला मंदिरात बीड नारी फोरमच्या वतीने नागपंचमीच्या दिवशी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सुमती पिंगळे तर व्यासपीठावर नारी फोरमच्या अध्यक्षा सुषमा कुलकर्णी, नभा थिगळे, माधुरी थिगळे, ज्योती शेटे, उमा शेटे या उपस्थित होत्या.



यावेळी वर्षा कुलकर्णी म्हणाल्या, गृहिणी म्हणून संसारात असलेल्या स्त्रीला माता, कन्या, बहिणी, सासू आदी विविध नात्यांतून जीवन जगावे लागते आणि हि नाती भारतीय संस्कृतीत कुटुंब व्यवस्था बळकट करत असते. जुने सोडायचे नाही, एकत्रित कुटुंब संस्कृतीमुळे जगाच्या पाठीवर भारताची एक वेगळीच ओळख आहे. आपण आपले संस्कार विसरले न पाहिजेत. संस्कारीत माणसाचे जीवन घडवण्यासाठी कुटुंबातील नाती जपणे आवश्यक आहे. स्त्री मंगळसूत्र घालते या मंगळसुत्राची जबाबदारी फार मोठी आहे. कुटुंब व्यवस्थेत महिलेला समुपदेशनाचेही कार्य करावे लागते. शहरात नवीन समाज व्यवस्थेमुळे कुटुंब विभक्तपणे राहतात पण सणावारांच्या निमित्ताने का होईना ते एकत्रित येतात. श्रावण महिन्यात महालक्ष्मीचे पूजन हा एकत्रित येऊन साजरा करण्याचा सण आहे. अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून संवाद वाढतात. सासू सून हे नाते अबाधित राहिले पाहिजे. प्रारंभी ॲड. किर्ती कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाची भूमिका विषद केली. वेदमूर्ती सदाशिव काका बेहरे यांनी वेदपठण केले. चंद्रकांत भुजबळ यांच्या हस्ते त्यांना संभावना देण्यात आली. यावेळी प्रज्ञा वर्तक, सुषमा कुलकर्णी, नभा थिगळे, माधुरी थिगळे, ज्योती शेटे, उमा शेटे, आनंदी महाजन, सई घसे यांची समयोजित भाषणे झाली. अध्यक्षीय भाषणात सुमती पिंगळे म्हणाल्या, आज सासू सुनेच्या मंदिरात त्रिकांडात्मक साधना आहे. सती सौभाग्यवती मनकर्णिकामातेची पुण्यतिथी, आदर्श सासू सुनेच्या मूर्ती स्थापनेचा वर्धापनदिन आणि नागपंचमीचा दिवस असून सती सौभाग्यवती मनकर्णिका माता या आदर्श कन्या, पत्नी आणि आदर्श माताही होत्या. जीवनात आपला स्वधर्म आपल्याला कळला पाहिजे. एकत्र येऊन घरात सुख, समाधान आणि आनंद सर्वांना मिळत असतो परंतु त्यासाठी मनाचा मोठेपणा दोघींनाही ठेवावा लागतो. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ॲड. किर्ती कुलकर्णी यांनी केले. माधुरी थिगळे यांच्या गायनाने या कार्यक्रमाचा समारोप झाला. प्रज्ञा वर्तक यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी अशोक काका महाजन, जगदीश पिंगळे, सुरेशराव कुलकर्णी, शिवाजीराव शेटे, द्वारकादास कुलकर्णी, गणेश भंडारे, चंद्रकांत भुजबळ, प्रदीप शेटे, गणेश राजहंस, विश्वभर थिगळे आदींसह अनेकजण उपस्थित होते.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात साहित्यरत्नलोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी

बीड (प्रतिनिधी):– श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड द्वारा संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू कन्या विद्यालयाच्या प्रांगणामध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष इंजि.बलभिमराव जाहेर पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. कदम. एस. डी., प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री.राऊत आर. टी.राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीम. आर.डी.लोखंडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस.डी. कदम यांनी केले. यावेळी शाळेतील सहशिक्षक के.बी. सोंडगे म्हणाले की,अण्णाभाऊ साठे यांनी बहुजन समाजातील पीडित समस्या यांना आपल्या साहित्यातून केंद्रबिंदू मानून दाहक सामाजिक अवस्थेचे वास्तव चित्रण केले. त्यांच्या अनेक कथा कादंबऱ्याचे देशी– विदेशी भाषांमध्ये अनुवाद





झाले. समाज परिवर्तनाचे मोलाचे कार्य त्यांनी केले. असे मनोगत मांडले. तसेच यावेळी अध्यक्षीय भाषणात इंजि. बलभीमराव जाहेर पाटील यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच अशी सिंहगर्जना करणारे भारतीय असंतोषाचे जनक, जहालमतवादी, क्रांतिकारक, थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करून मार्गदर्शन केले.

या दोन्ही महापुरूषांच्या जीवन चरित्रा विषयी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा व शब्दलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील असंख्य विद्यार्थीनींनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन यादव एस.बी. यांनी केले तर आभार श्रीम. वाव्हळकर जे. एस.यांनी मानले. या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# उपेक्षितांच्या व्यथा व दुःखाला साहित्यातून मांडणारा आवाज म्हणजेच आण्णाभाऊ साठे:पप्पू कागदे

बीड (सरकार) साहित्य सम्राट लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा अनु-जाती जमाती संघर्ष समितीचे अध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून अभिवादन रॅली व क्रांती मशाल रॅली काढून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. वास्तववादी साहित्य निर्माण करणारे साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या हयातीत १५ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, पटकथा, नाटके, पोवाडे यांच्या माध्यमातून साहित्याचा डोंगर उभा केला. साहित्यरत्न लोकशाहीर





आण्णाभाऊ साठे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे वारसदार होते.

फकीरा ही कादंबरी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समर्पित करून म्हणाले की जग बदल घालून घाव मज सांगून गेले भीमराव या महीप्रमाणे ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गुरुस्थानी मानीत होते. फकीरा कादंबरीला १९६१ साली राज्य सरकारकडून उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला होता. आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लिखाणात संयुक्त महाराष्ट्र चळवळ मुंबई महाराष्ट्राला मिळाली पण बेळगाव हे कर्नाटकमध्ये विलीन करण्यात आले. तेव्हा अण्णाभाऊंनी कवन रचून महाराष्ट्र प्रेम व्यक्त केले. माझी मैना गावावर राहिली माझ्या जीवाची होतीया काहिली साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांनी उपेक्षितांच्या व्यथा व दुःखाला जगासमोर मांडून त्यांना आपल्या साहित्यातून न्याय मिळवून देण्यासाठी निर्माण केलेले साहित्य आजच्या युवक पिढीने आत्मसात करून इतरांना वाचण्यासाठी प्रवृत्त केले तरच आण्णाभाऊ साठे यांना खरे अभिवादन ठरेल.

असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती प्रसंगी केले. यावेळी मा. आ.राजेंद्र जगताप, राजू जोगदंड, किसन तांगडे, अशोक लोढा, प्रकाश कानगावकर, अजय सवाई, शेख निजाम, दादा हातागळे, विकास बामणे, मायताई मिसळले, रेश्मा ताई जोगदंड, शोभा गलांडे, महेश आठवले, बापू पवार, शेख खदीरभाई, नागेश अण्णा दुबळे, प्रभाकर चांदणे,अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, दिलीप खंदारे, नाना मस्के, शितलकुमार सुकाळे, भैय्या साळवे, भैय्या मस्के, सुभाष तांगडे, अरुणा निर्मळ, अनिता तुरूकमारे, उषा सोनकांबळे, कविता कोरडे, माया साबळे, अक्षय कोकाटे, सतिष शिनगारे, संभाजी गायकवाड, शाम वीर, के.के.कांबळे, नागेश शिंदे, भाऊसाहेब दळवी, नामदेव वाघमारे, रतन वाघमारे, भास्कर जावळे, नवनाथ डोळस, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अप्पा मिसळे, पप्पू वाघमारे, गणेश वाघमारे, पिंटू गव्हाणे, दीपक कांबळे, प्रताप धन्वे, रमेश जावळे, सचिन वडमारे, जितू धन्वे, बाबू भालेराव, संजय हनवते, बबन वाघमारे, कृष्णा पाटोळे, अजिंक्य वडमारे, सोनू वडमारे, विशाल साळवे, बिभीषण जावळे, गोरख जोगदंड, प्रकाश वडमारे, रामेश्वर खळगे, सनी जोगदंड, बबलू जोगदंड, विशाल मीसळे यांच्यासह हजारो कार्यकर्तेअभिवादन रॅलीत सामील झाले होते.

## बाल संरक्षणावर जिल्हास्तरीय कार्यशाळा

बीड (सरकार): युवा ग्राम विकास मंडळ, बीड आणि महिला व बाल विकास कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बाल संरक्षण जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा २ऑगस्ट २०२५ रोजी, अन्विता हॉटेल, जालना रोड, बीड येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे.

बालकांवरील अत्याचार (POCSO) आणि बाल विवाह प्रतिबंधक कायद्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे कशी करावी, यावर या कार्यशाळेत मार्गदर्शन केले जाणार आहे. या कार्यशाळेमध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा बालविवाह प्रतिबंधक कृती दल समितीचे अध्यक्ष विवेक जॉन्सन (भा.प्र.से.) कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान (भा.प्र.से.), असणार आहेत. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मा. फारूक शेख यांचीही उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन एच. पी. देशमुख, प्रकल्प संचालक, युवा ग्राम विकास मंडळ यांनी केले आहे.

हा उपक्रम बालकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार असून, सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री. देशमुख यांनी केले आहे.

## दहावी निकालानंतर विद्यार्थ्यांसाठी एचएससी व्होकेशनल अभ्यासक्रम उत्तम पर्याय

### बीड जिल्हा व्यवसाय शिक्षण विभागाची माहिती

बीड (सरकार): बीड जिल्ह्याचा दहावीचा निकाल यंदा ९५ टक्के लागून विभागात प्रथम क्रमांकाने उजळला आहे. निकालानंतर विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी योग्य पर्याय निवडण्याचे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी डॉ. पी. डी. उखळीकर यांनी केले आहे. १० वी नंतर मेडिकल व इंजिनिअरिंगसाठी विज्ञान शाखा हे उत्तम पर्याय असून हे प्रामुख्याने ९० टक्केपेक्षा अधिक गुणधारक विद्यार्थ्यांसाठी सुचविण्यात आले आहे. दरम्यान, ६० ते ९० टक्के गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निक, आयटीआय आणि डी-फार्मसीसारखे व्यावसायिक अभ्यासक्रमही अत्यंत उपयुक्त ठरू शकतात.

३५ ते ६० टक्के गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना एच.एस.सी. व्होकेशनल (+२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय) अभ्यासक्रम हे उत्कृष्ट पर्याय ठरू शकतात. 'चउतउ' नावाने ओळखले जाणारे हे अभ्यासक्रम ७० टक्के व्यवसाय व ३० टक्के सामान्य शिक्षणाचा समावेश करतात. बीड जिल्ह्यात कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी, फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, अकौंटिंग व ऑफिस मॅनेजमेंट, फायनान्शियल सर्व्हिसेस व इन्शुरन्स, लॉजिस्टिक व सप्लाय चेन मॅनेजमेंट, मेडिकल लॅब टेक्निशियन, ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी, हॉर्टिकल्चर, चाईल्ड व ओल्ड एज केअर सर्व्हिसेस, ऑप्थॉलमिक व एक्स-रे टेक्निशियन हे विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

या अभ्यासक्रमांसाठी अनुभवी व उच्च शिक्षित शिक्षक वर्ग कार्यरत असून कमी प्रवेश फीसमध्ये सहज प्रवेश मिळवता येतो. इच्छुक विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी शिवाजी खाडे (मो. ९३२५७१२२७८), दीपक देशमुख (९४२२२९५३४८), शेख जावेद पाशा (७३८५७७६७८६), छाया खोसे (८८०६७१७१०६) यांच्याशी किंवा चंपावती शाळेच्या पाठीमागे, शासकीय आयटीआय परिसरातील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

बीड (सरकार): सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाहीर, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.

साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे हे मराठी भाषेला पडलेले एक गोड स्वप्न आहे. अण्णाभाऊ हे गिरणी कामगारांचे सक्रीय नेते होते.त्यांनी आपल्या साहित्यात उपेक्षितांचे जीवन रेखाटण्याचे काम केले. त्यांनी एकूण ३५ कादंबर्या, १९ कथासंग्रह , वगनाट्य, लावण्या असे मौलिक साहित्य निर्माण केले. त्यांच्या बर्याच कादंबरीवर मराठी चित्रपट निर्माण झालेले आहेत. अण्णाभाऊंची फकीरा ही कादंबरी राष्ट्रपती पारितोषिक विजेती असून त्यांनी ही कादंबरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दमदार लेखणीस अर्पण केलेली आहे. अण्णाभाऊंचे साहित्य सर्वप्रथम रशियन भाषेमध्ये भाषांतरीत झालेले आहे. अण्णाभाऊ सर्व भारताला माहिती होण्या अगोदर ते रशियाला माहिती झाले होते. कारण त्यांनी लेणीण ग्राडचा पोवाडा लिहून अजरामर केलेला आहे. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस. कमवि उपप्राचार्य डॉ.एन.आर.काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालींदर कोळेकर आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रदीप साळूंके यांनी केले तर आभार प्रा.डॉ.रामनाथ वाढे यांनी केले.यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## नवगण महाविद्यालय, परळी वैजनाथ येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी




परळी वैजनाथ (सरकार): नवगण महाविद्यालय, परळी वैजनाथ येथे दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त व अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. लालासाहेब घुमरे, प्रा. बबन झांजे आणि डॉ. सुदर्शन अवस्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना (छडड) कार्यक्रमाधिकारी डॉ. बबन मोहिते यांनी केले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यात ४ ऑगस्टपासून डाक विभागाची नवी प्रणाली

बीड (सरकार): भारतीय डाक विभागाने डिजिटल उत्कृष्टतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत पुढील पिढीच्या प्रणालीची घोषणा केली आहे. बीड विभागातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये ४ ऑगस्ट २०२५ पासून ही अपग्रेड केलेली नवी प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे.




या संक्रमणासाठी २ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व कार्यालये बंद ठेवण्यात येणार असून, कोणतेही सार्वजनिक व्यवहार होणार नाहीत. डेटा मायग्रेशन, प्रणालीचे वैधीकरण आणि कॉन्फिगरेशनच्या प्रक्रियेसाठी हा डाऊनटाईम अत्यावश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.नवीन डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे टपाल सेवा अधिक जलद, सुरक्षित व ग्राहक-अनुकूल होणार असून, स्मार्ट व भविष्यनिश्चित प्रणालीचा अनुभव ग्राहकांना मिळणार आहे. डाक विभागाच्या अध्यक्षांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले आहे.

## राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

बीड (सरकार) प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय बीड व राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय उच्च माध्यमिक(+२) बीड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षा राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती तायडे डी. ओ. ह्या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. ए. आय. पाटील व प्रा. सौ. मंत्री एस. ए. ह्या होत्या. त्यानंतर प्रमुख पाहुण्या सौ.मंत्री ए. एस. यांनी लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन व कार्य यावर मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक श्री. पाटील ए. आय. यांनी साहित्यरतन अण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्र यावर प्रकाश टाकला. प्राचार्य श्रीमती तायडे डी.ओ. यांनी विद्यार्थ्यांनी महापुरुषाचा वारसा जपावा . आपल्याला जीवनात मिळालेल्या संधीचे सोने करावे. एकाग्रतेने अभ्यास करून आई-वडिलांचे नाव मोठे करावे असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वाघमारे ए.के. तर आभार प्रदर्शन सौ. घाटे आय.एस. यांनी मानले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विद्युत सहाय्यकपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

बीड (सरकार): वंजारवाडी गावातील सहा विद्यार्थ्यांची नुकतीच विद्युत सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. गावचे सरपंच मा. श्री. वैजिनाथ (नाना) तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात पार पडला.



यावेळी सरपंच नाना म्हणाले की, शिकण्याची जिद्द असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला माझ्याकडून सर्वतोपरी मदत केली जाईल. अगदी गरिबातला गरीब मुलगाही मोठ्या पदावर पोहोचावा, हीच माझी इच्छा आहे. आता उर्वरित आयुष्य केवळ गावाच्या सेवेसाठी अर्पण करणार आहे. छोट्यास्या असणाऱ्या वंजारवाडी गावात यापुर्वीच पावनेचारशे नोकरदार आहेत. त्यात या सहा जनाची भर पडली आहे. आपले उपक्रम यशस्वी होत आहेत. आपल्या गावातील मुल नोकरीला लागत आहेत. याचा मला मनस्वी आनंद होत आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. यात अनुक्रमे मोहन महादेव कुटे, कृष्णा संतराम मोराळे, प्रदीप साहिनाथ खाडे, शुभांगी विठ्ठल खाडे, विजय सोपान वनवे, उमेश अर्जुन शेंडगे या सर्वांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला लक्ष्मण पवारसाहेब, महादेव कुटे, पांडुरंग नाना राख, नवनाथ तांदळे फौजी, विठ्ठल आप्पा, गणेश तांदळे, संजय तांदळे, आचन महाराज, गजानन तांदळे, बाबासाहेब तांदळे, सुग्रिव तांदळे, बाबासाहेब चव्हान, सुभाष झाझुंर्णे, नागनाथ सातपुते, लक्ष्मण पवळ, मुकेश पवळ, तात्याराम बाप्पु, शिवाजी कुटे, महादेव कुर्लेकर, अशोक धुरंधरे, ज्ञानोबा कुटे, ज्ञानेश्वर मोराळे, राजेश तांदळे, महादेव तांदळे, चंद्रहास कुटे, विश्वनाथ तांदळे, अवी कुटे, बाळु कुटे, विजय तांदळे यासह गावातील पुरुष, महिलावर्ग, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार समारंभाने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नविण मुलांमध्ये स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लोमेश तांदळे सर यांणी केले.

## बीड-अहिल्यानगर-मुंबई रेल्वे सुरू करण्याची मागणी

बीड (सरकार) बीड-अहिल्यानगर या रेल्वे मार्गाचे विद्युतीकरणाचे काम पुर्णत्वास येत असून बीड,अहिल्यानगर,मुंबई या मार्गावरती प्रवासी रेल्वे चालू करावी अशी मागणी बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समीतीच्या काल झालेल्या बैठकीत करण्यात आली.

काल बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री.सत्यनारायणजी लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी कृती समितीची बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीमध्ये प्रामुख्याने अहिल्यानगर बीड परळी या मार्गावरील रेल्वेच्या कामाच्या संदर्भात तसेच विद्युतीकरणाच्या कामा संदर्भात चर्चा करण्यात आली. या सोबतच कृती समितीच्या अध्यक्षांनी या मार्गावरील कामाच्या संदर्भातील आढावा या बैठकीत मांडला. या सोबतच या बैठकीमध्ये रेल्वेच्या अहिल्यानगर बीड परळी मार्गावरील ज्या काही आडीअडचणी असतील त्या संदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील रेल्वे कामाच्या सर्वे संदर्भात चर्चा करण्यात आली तसेच धाराशिव, बीड, आहिल्यानगर या मार्गावरील कामाचा देखील आढावा या बैठकीत घेण्यात आला. तसेच बीड, आहिल्यानगर, मुंबई या मार्गावर रेल्वेचे विद्युतीकरणाचे काम पुर्ण होत असून बीड, अहिल्यानगर,मुंबई ही प्रवाशी रेल्वे सुरू करण्यात यावी या संदर्भातले निवेदन जिल्हाधिकार्यांना देण्यात येणार असून या संदर्भात बीड चे खासदार बजरंग सोनवणे, आणि धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांना देखील या संदर्भात निवेदन देण्यात येणार असून धाराशिव, बीड, संभाजीनगर या मार्गावरील रेल्वेच्या कामासाठी या दोन खासदारांसोबत शिष्टमंडळ रेल्वे मंत्र्यांना भेटण्या संदर्भात चर्चा झाली आणि इतर ही आडीअडचणी सोडवणे संदर्भात कृती समिती लवकरच पुढचे पाऊल उचलणार असून या दोन्ही मार्गाच्या कामासंदर्भात लवकरच कृती समितीनी आढावा घेण्याचे ठरले असून बीड ,अहिल्यानगर, मुंबई ही प्रवाशी रेल्वे प्रामुख्याने चालु करण्यात यावी अशी मागणी रेल्वे मंत्र्यांना भेटून करण्याचे बैठकीत ठरले या बैठकीस बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा,सुनिल नामदेवराव क्षीरसागर, सुरेश नाना मेखे, विलासरावजी बझो बापु, अरूणरावजी डाके नाना, प्रा.अरूणरावजी भस्मे, बीड जिल्हा व्यापारी संघटेनेचे अशोक मनोहर अप्पा शेटे, सुरेश नटवरलाल बुध्ददेव, लईक अहेमद, शिवाजीरावजी जाधव, व इतर सदस्य उपस्थित होते.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)